## यशवंतराव चव्हाण स्मृतिव्याख्यान आणि विशाखा काव्य पुरस्कार वितरण

नवमहाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण ह्यांचा स्मृतिदिन २५ नोव्हेंबर, त्यानिमित्त महनीय विचारवंत वक्त्यांचे स्मृतिव्याख्यान या दिवशी आयोजित करण्यात येते. तसेच कवी कुसुमाग्रजांच्या गौरवार्थ त्यांच्या ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त विशाखा ह्या काव्यसंग्रहाच्या नावाने 'विशाखा काव्य पुरस्कार' कुसुमाग्रज प्रतिष्ठानने दिलेल्या निधीत विद्यापीठाचा निधी जमा करून प्रतिवर्षी या दिवशी दिला जातो.




प्रथम पुरस्कार : रु. २१०००/- रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
द्वितीय पुरस्कार : रु. १५०००/- रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र
तृतीय पुरस्कार : रु. १००००/- रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र

नियम :

(१) नवोदित कवीच्या प्रथम कविता संग्रहालाच हा पुरस्कार दिला जातो.
(२) काव्यसंग्रहाच्या पाच प्रती व लेखी प्रतिज्ञापत्र कवीने पाठविणे आवश्यक असते.
(३) सदर पुरस्कार विभागून दिले जात नाहीत.
(४) हस्तलिखितांचा व कात्रणांचा विचार केला जात नाही.
(५) पुरस्कारप्राप्त कवींना समारंभस्थळी येण्यासाठी प्रवास खर्च दिला जातो.
(६) प्रस्ताव पाठविण्याची शेवटची तारीख : ३० एप्रिल

## महात्मा जोतिराव फुले स्मृतिव्याख्यान आणि रुक्मिणी पुरस्कार वितरण

२८ नोव्हेंबर, क्रांतिबा जोतिराव फुले ह्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या विचार व आचाराला कार्यप्रवण करणाऱ्या महनीय वक्त्यांचे व्याख्यान आयोजित करून ''रुक्मिणी पुरस्कार'' वितरण




समारोह होतो. हा पुरस्कार विभागीय केंद्राचे संचालक डॉ. शरणकुमार लिंबाळे ह्यांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणीतून जमा केलेल्या निधीमध्ये विद्यापीठाचा निधी जमा करून प्रतिवर्षी दिला जातो. पंढरीचा विठोबा आणि रुक्मिणी हे वारकरी चळवळीचे ऊर्जाकेंद्र होय. कृषी, ग्रामीण विकास, पर्यावरण, समाजसेवा, कला, क्रीडा, शिक्षण, पत्रकारिता, प्रशासन व आरोग्य इ. क्षेत्रात कर्तृत्व गाजवणाऱ्या स्त्रियांना हा पुरस्कार दिला जातो.

पुरस्कार : रु. २१०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र

नियम :

(१) महाराष्ट्र राज्यात गेल्या दशकात कर्तृत्वाचा ठसा निर्माण करणारी महिला, तिची भरीव कामगिरी जनमानसातील प्रतिमा, सचोटी, सार्वजनिक जीवनातील चारित्र्य आदींचा प्रामुख्याने विचार केला जातो.

(२) हा पुरस्कार ५० वर्षे व यापर्यंतच्या प्रौढ, कर्तबगार महिलेस दिला जातो.

(३) प्रस्ताव पाठविण्याची शेवटची तारीख : ३१ जुलै



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिव्याख्यान आणि बाबूराव बागूल स्मृती पुरस्कार वितरण

६ डिसेंबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा महापरिनिर्वाण दिन त्यानिमित्त त्यांच्या विचार व आचाराला कार्यप्रवण करणाऱ्या महनीय वक्त्यांचे व्याख्यान आणि ज्येष्ठ साहित्यिक बाबूराव बागूल स्मृती पुरस्कार वितरण समारोह आयोजित केला जातो. हा पुरस्कार बाबूराव बागूल गौरव समितीने दिलेल्या निधीत विद्यापीठाचा निधी जमा करून नवोदित कथा लेखकास प्रतिवर्षी व्याजाच्या रकमेतून दिला जातो.

पुरस्कार : रु. २१०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र

नियम :

(१) कथाकाराचा पहिला कथासंग्रह असावा.

(२) कथासंग्रहाच्या तीन प्रती व प्रतिज्ञापत्र पाठवणे आवश्यक.

(३) हस्तलिखित व कात्रणांचा विचार केला जात नाही.

(४) सदर पुरस्कार विभागून दिला जात नाही.

(५) पुरस्कारप्राप्त कथाकारास समारंभस्थळी येण्यासाठी प्रवास खर्च दिला जातो.

(६) प्रवेशिका पाठविण्याची शेवटची तारीख : ३० जुन

## डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिव्याख्यान आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिपुरस्कार वितरण



२७ डिसेंबर डॉ. पंजाबराव देशमुख ह्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या विचार व आचाराला कार्यप्रवण करणाऱ्या महनीय वक्त्यांचे व्याख्यान आणि डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतिपुरस्कार वितरण समारोहाचे आयोजन केले जाते. हा पुरस्कार श्री. शिवाजी शिक्षण संस्था अमरावती यांनी विद्यापीठाकडे देणगी दिली, त्या रकमेच्या व्याजातून आदर्श शिक्षण संस्थेस/व्यक्तीस आलटून पालटून प्रतिवर्षी दिला जातो. १९४८ च्या दरम्यान लोकविद्यापीठाची संकल्पना डॉ. पंजाबराव देशमुखांनी मांडली आणि शिक्षणाला जीवनाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. ह्या विचारांनी कार्य करणाऱ्या संस्थेस/व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

पुरस्कार : रु. २१०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र

नियम :

(१) हा पुरस्कार पारंपरिक शिक्षणाच्या क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या संस्थेस किंवा व्यक्तीस दरवर्षी आलटून पालटून देण्यात येतो.

(२) वैचारिक लेखन, संशोधन, प्रकल्प, प्रयोग, असे लोकशिक्षणाचे कार्य संस्था किंवा चळवळीद्वारे व्यक्तीने/संस्थेने केले असल्यास हा पुरस्कार दिला जातो.

(३) हा पुरस्कार व्यक्ती किंवा संस्थेस एकदाच दिला जातो. सदर पुरस्कार मरणोत्तर दिला जात नाही.

(४) महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंकडून, आपल्या विद्यापीठाचे अंतर्गत संलग्न संस्था व व्यक्तींकडून नामनिर्देशन मागवले जाते.

(५) मोजके साहित्यिक, संपादक, साहित्य, संस्था, सामाजिक कार्य करणाऱ्या व्यक्ती ह्यांच्याकडूनही नामनिर्देशन मागविण्यात येते.

(६) नामनिर्देशनाची अंतिम तारीख : ३१ ऑगस्ट

## कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतिव्याख्यान व ''ज्ञानदीप'' आणि ''श्रमसेवा'' पुरस्कार वितरण

### ज्ञानदीप पुरस्कार

९ मे कर्मवीर भाऊराव पाटील स्मृतिदिनी त्यांच्या विचार व आचाराला कार्यप्रवण करणाऱ्या महनीय वक्त्यांचे व्याख्यान आणि 'ज्ञानदीप' व 'श्रमसेवा' पुरस्कार वितरण समारोहाचे आयोजन केले जाते. श्री. चंद्रकांत सा. कुशारे, नाशिक ह्यांच्या आई गंगामाई सावळेराम कुशारे स्मरणार्थ 'श्रमसेवा' पुरस्कार आणि पत्नी इंदुमती चंद्रकांत कुशारे ह्यांच्या स्मरणार्थ 'ज्ञानदीप' पुरस्कार दिला जातो. त्यांनी दिलेल्या देणगीच्या रकमेत विद्यापीठाच्या निधीची भर घालून त्या रकमेच्या व्याजातून दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात.



### ज्ञानदीप पुरस्कार

ज्ञानदीप पुरस्कार : रु. २१०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र

नियम :

(१) हा पुरस्कार दूरशिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला देण्यात येतो.

(२) दूरशिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी संशोधन करणाऱ्या व्यक्तीलाही हा पुरस्कार दिला जातो.

(३) वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे व परिपत्रके पाठवून नामनिर्देशन मागविण्याबाबत निवेदने दिली जातात. त्यानंतर एक महिन्याच्या आत शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, शिक्षणतज्ज्ञ इत्यादी नामनिर्देशन करू शकतात.

(४) हे नामनिर्देशन सर्वांसाठी खुले असते.

(५) नामनिर्देशनाची शेवटची तारीख : ३१ ऑक्टोबर

## श्रमसेवा पुरस्कार




'श्रमसेवा' पुरस्कार : रु. २१०००/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र

नियम :

(१) आपल्या श्रम आणि सेवेने उपेक्षित वर्गातल्या महिलांची उन्नती करणाऱ्या महिलेला किंवा महिला संस्थेला हा पुरस्कार दिला जातो.

(२) आदिवासी महिला, शेतकरी महिला, परिचारिका, अनाथालय किंवा सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी महिला संघटक ह्या पुरस्कारासाठी नामनिर्देशन पाठवू शकतात.

(३) प्रतिवर्षी वृत्तपत्रे, प्रसार माध्यमे व परिपत्रकांन्वये नामनिर्देशन मागविण्यासाठी निवेदने प्रसिध्द केली जातात.

(४) नामनिर्देशनाची अंतिम तारीख : ३० सप्टेंबर

## कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार



ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी आणि नाशिकचे ग्रामदैवत पद्मभूषण कै. वि. वा. शिरवाडकर तथा कविवर्य कुसुमाग्रज ह्यांच्या कार्याचे यथोचित स्मारक म्हणून २००९ रोजी विद्यापीठाने कुसुमाग्रज अध्यासनाची स्थापना केली.

कुसुमाग्रज अध्यासनामार्फत भारतीय साहित्य निर्मितीत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या साहित्यिकास प्रतिवर्षी कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार दिला जातो.

पुरस्कार निवडीसाठी नामांकित साहित्यिक व मराठीव्यतिरिक्त इतर भाषांतील साहित्याचा अभ्यास असणाऱ्या सदस्यांची समिती नियुक्त केली जाते.

पुरस्काराचे स्वरूप

रु. १ लाख रोख, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह

हा पुरस्कार कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी २७ फेब्रुवारी रोजी किंवा त्यांच्या स्मृतिदिनी १० मार्च रोजी देण्यात येतो.